प्रेस नोट ता. ०६/१०/२०२४

# सराईत वाहन चोरटा जेरबंद - १३ मोटर सायकल व ०२ रिक्षा हस्तगत करुन १५ गुन्हे उघड

## गुन्हे शाखा युनिट २ ची उल्लेखनिय कामगिरी

मा. पोलीस आयुक्त श्री विनयकुमार चौबे साहेब यांनी वाहनचोरीचे गुन्हे उघडकीस आणणेबाबत गुन्हे शाखांना आदेशीत केले आहे. गुन्हे शाखा युनिट २ चे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम त्यांचे अधिपत्याखालील पोलीस अधिकारी व अंमलदार पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीमध्ये वाहनचोरी गुन्हयांचा समांतर तपास करुन संशयित गुन्हेगारांची माहीती घेत असतांना दिनांक ०५/१०/२०२४ रोजी श्रेणी पोलीस उप निरीक्षक शिवानंद स्वामी व पोलीस हवालदार जयवंत राउत यांना त्यांचे गोपनिय बातमीदाराकरवी बातमी मिळाली कि, एक इसम चोरीची मोटर सायकल घेवून खराळवाडी पिंपरी भागात फिरत आहे अशी खात्रीशीर माहीती मिळाली.

गुन्हे शाखा पोलीस उप आयुक्त संदीप डोईफोडे व सहा. पोलीस आयुक्त डॉ. विशाल हिरे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट २ चे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांनी गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांचे एक पथक तयार करुन सदर पथकाला सुचना व मार्गदर्शन करुन तात्काळ खराळवाडी पिंपरी भागात वाहनचोरीचे माहीतीची खातरजमा करणेसाठी पाठविले. खराळवाडी पिंपरी येथील पंजाब केमीकल फॅक्टरी जवळ एक इसम पल्सर मोटर सायकलसह संशयितरित्या थांबला असल्याचे पोलीस पथकाचे निदर्शनास आले. त्याचवेळी सदर इसमाला पोलीस आल्याची चाहूल लागल्याने तो मोटर सायकल सुरु करुन पळुन जाण्याचा प्रयत्न करीत असतांना सापळा लावुन पोलीस पथकाने आरोपी शंकर भरत देवकुळे वय ३२ वर्षे रा. सध्या संक बिल्डींग भाजी मंडईजवळ उरुळी देवाची ता. हवेली जि. पुणे मुळ रा. फकीरानगर, वैरागनाका ता. जि. धाराशिव यास अत्यंत शिताफीने चोरीच्या पल्सर मोटर सायकलसह शिताफीने ताब्यात घेतले. पल्सर मोटर सायकल मेट्रो स्टेशन पिंपरी येथुन चोरल्याची कबुली दिली. मेट्रो स्टेशन परिसरातुन मोठया प्रमाणात वाहनचोरीचे गुन्हे घडलेले असल्याने व आरोपी शंकर भरत देवकुळे हा सराईत वाहन चोरटा असल्याने त्यास अत्यंत विश्वासात कौशल्यपुर्ण तपास केला असता त्याने पिंपरी चिंचवड शहर, पुणे शहर तसेच शांतीनगर भिवंडी एकूण १३ मोटर सायकल व ०२ प्रवाशी वाहतुकीच्या ॲटो रिक्षा बनावट चावीचा वापर करुन चोरल्याची कबुली दिली.

### हस्तगत केलेली मोटर सायकल व रिक्षा वाहने -

१) एम एच १५ एफके ८७१८ - बजाज कंपनीची पल्सर
२) एम एच १४ बी बी ०१८८ - हिरो होंडा कंपनीची फॅशन प्लस मोटार सायकल
३) एम.एच.१४ जी.सी.९०२० - बजाज कंपनीची ॲटो रिक्षा
४) एम एच -१२-डी एक्स -१५८६ - हीरो होंडा कंपनीची पॅशन प्लस मोटर सायकल
५) एम एच १४ एच ए ९७९४ -होंन्डा कंपनीची शाईन मोटर सायकल
६) एमएच १४ बी वाय ९०४७ - होंडा कंपनीची ॲक्टीव्हा मोपेड
७) एम एच १४ डी झेड ४८६१ - यामाहा कंपनीची रे-मॉडेल मोपेड
८) एम एच १२ जे बी २०९२ - हिरो स्प्लेंन्डर मोटर सायकल
९) एम एच १४ डी व्हि ७६३४ - हिरो कंपनीची स्प्लेंडर
१०) एमएच १४ ईके०९५७ -होन्डा कंपनीची ड्रीम निओ
११) एम एच १२ एसपी २११८ - स्लेंडर मोटर सायकल
१२) एम एच १२ आर जी ४८०६ - हिरो कंपनीची स्प्लेंडर मोटर सायकल

१३) एम एच १२ जेआर ९८८६ - हिरो होंन्डा कंपनीची मोटर सायकल
१४) एम एच १२ बी सी ८४६४ - होंडा कंपनीची स्प्लेंडर मोटर सायकल
१५) एमएच ०४ एचजे २३९५ - बजाज कंपनीची ॲटो रिक्षा

## उघडकीस आलेले गुन्हे -

१) पिंपरी पोस्टे गुन्हा रजिस्टर नंबर ५६९/२०२४ भादवि कलम ३७९
२) निगडी पोस्टे गुन्हा रजिस्टर नंबर ४४२/२०२४ बीएनएस कलम ३०३ (२)
३) निगडी पोस्टे गुन्हा रजिस्टर नंबर ४३८/२०२४ बीएनएस कलम ३०३ (२)
४) भोसरी पोस्टे गुन्हा रजिस्टर नंबर ६१०/२०२४ बीएनएस कलमः- ३०३ (२)
५) निगडी पोस्टे गुन्हा रजिस्टर नंबर ६००/२०२४ बीएनएस कलम ३०३ (२)
६) चिंचवड पोस्टे गुन्हा रजिस्टर नंबर ३४२/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२)
७) चिंचवड पोस्टे गुन्हा रजिस्टर नंबर ४०० /२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२)
८) दिघी पोस्टे गुन्हा रजिस्टर नंबर ३४३ /२०२४ भारतीय न्याय संहिता चे कलम ३०३ (२)
९) रावेत पोस्टे गुन्हा रजिस्टर नंबर ४०२/२०२४ भारतीय न्याय संहिता चे कलम ३०३ (२)
१०) खडकी पोस्टे गुन्हा रजिस्टर नंबर २४८/२०२४ भारतीय न्याय संहिता चे कलम ३०३ (२)
११) हडपसर पोस्टे गुन्हा रजिस्टर नंबर ७७१/२०२४ भादवि कलम ३७९
१२) भारती विद्यापीठ पोस्टे गुन्हा रजिस्टर नंबर ५३१/२०२४ भादवि कलम ३७९
१३) भारती विद्यापीठ पोस्टे गुन्हा रजिस्टर नंबर ७२०/२०२४ भारतीय न्याय संहीता कलम ३०३ (२)
१४) वानवडी पोस्टे गुन्हा रजिस्टर नंबर २२३/२०२४ भादवि कलम ३७९
१५) शांतीनगर पोस्टे गुन्हा रजिस्टर नंबर १५५६/२०२४ भारतीय न्याय संहीता कलम ३०३ (२)

आरोपी शंकर भरत देवकुळे हा सराईत वाहनचोरीचे गुन्हे करणारा सराईत गुन्हेगार असुन पुणे शहर, पुणे ग्रामीण, पिंपरी चिंचवड, धाराशिव, अहील्यानगर या ठिकाणी मोठया प्रमाणात वाहनचोरी केल्या असुन सुमारे ७० वाहनचोरीचे गुन्हे दाखल आहेत. सदर आरोपीत हा हॅन्डल लॉक नसलेल्या, मेट्रो स्टेशन व निर्जनस्थळी पार्कींग केलेल्या मोटर सायकली व रिक्षा बनावट चावीचा वापर करुन चोरी करीत होता. चोरीची वाहने अशिक्षीत लोकांना विक्री करुन पैसे कमविण्याचे प्रयत्नात असतांना त्यास गुन्हे शाखेकडून पकडण्यात आले आहे. नागरिकांनी आपली वाहने सुरक्षित पार्कींग ठिकाणी, हॅन्डल लॉक करुन पार्कींग करावीत व वाहनांचे पार्कींगमध्ये संशयित इसम दिसुन आल्यास तात्काळ नियंत्रण कक्षाला माहीती कळवावी असे आवाहन पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचेवतीने करण्यात येत आहे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री विनय कुमार चौबे, सह पोलीस आयुक्त श्री शशिकांत महावरकर , अप्पर पोलीस आयुक्त श्री वसंत परदेशी, पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री संदिप डोईफोडे, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे श्री विशाल हिरे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट २ चे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक श्री जितेंद्र कदम, पोलीस उप निरीक्षक गणेश माने, श्रेणी पोलीस उप निरीक्षक शिवानंद स्वामी, दिलीप चौधरी, प्रमोद वेताळ, जयवंत राऊत, उषा दळे, देवा राऊत, नामदेव कापसे, विपुल जाधव, सागर अवसरे, आतिष कुडके, अजित सानप, संदेश देशमुख, शिवाजी मुंढे, उध्दव खेडकर यांनी केली आहे.

(संदिप डोईफोडे)
पोलीस उप आयुक्त गुन्हे
पिंपरी चिंचवड